# गुहागर ते चिपळूण - एक प्रवासवर्णन ! (१२ मे २०२३)

गुहागरहून ३.00 वाजेची लाल परी मिळाली. म्हणजे ४.00 वाजेपर्यंत चिपळूणला पोहोचायचा अंदाज होता. बसमध्ये बसल्या बसल्या सहज ट्रेन वेळेवर आहे की नाही पाहायला म्हणून 'where is my train' ॲप उघडले तर लक्षात आले की ट्रेन ६.५२ ला नसून ७.५२ ला आहे. म्हणजे एक तास जास्त टाईमपास करावा लागणार होता तर. आता काय करावे याचा विचार करता करता साधारण ४.१५ च्या सुमारास चिपळूणला पोहोचलो. खाली उतरून गूगल मॅप्स मध्ये पाहिले तर रेल्वे स्टेशन इनमीन २.५ किलोमीटरच होते. गूगल काकांच्या हिशोबाने ३५ ते ४० मिनिटांचा रस्ता. तसेही ऊन उतरायला लागले होते,आणि रस्ता गावाच्या गल्यागल्यांमधून होता. म्हणून मग चालतच स्टेशनला जायला निघालो. पहिली १० मिनिटे उन्हाचा जरा त्रास झाला खरा, पण त्या नंतरचा रस्ता मात्र सावलीचा आणि शांत गल्यांमधुन होता. अधल्या मधल्या झाडींतून पक्षांची किलबिल कानावर पडत होती. मध्येच सुर जरा वाढल्या सारखा वाटला म्हणून वर पाहिले तर विजेच्या तारेवर एक सुंदर पक्षी दिसला. पांढरे पोट आणि निळसर पंख. किंगफिशर असावा (नुसताच एक अंदाज. तसे मला पक्ष्यांमधले काही कळत नाही). छायाचित्र टिपण्याचा एक प्रयत्न केला, पण तो काही सफल झाला नाही. तसाच पुढे चालत राहिलो, पण आता दमलो होतो. एक पूल दिसला, वाशिष्ठी नदीवरचा. शांत वाहणारे पाणी, उतरणीला लागलेला सूर्य, अथांग निळे आकाश. ते सौंदर्य शांत चित्ताने अनुभवण्याचा मोह आवरता आला नाही. पुलाच्या मधोमध जाऊन पाठीवरचं बोचकं (म्हणजे माझा संसार असलेली माझी सॅक) खाली ठेवली आणि जरा विसावलो. मधूनच येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकांनी ५ च मिनिटात श्रमपरिहार झाला अन् मी फोटो काढायला सुरुवात केली. अगोदर पश्चिमेकडे संथ गतीने खाली जाणाऱ्या सूर्याला टिपण्याचा उद्योग केला अन् मग मोर्चा पूर्वेला वळवला. विस्तीर्ण पात्रं आणि पार्श्वभूमी वरील डोंगरांची आरास एकाच फोटोमध्ये यावी म्हणून सेटिंग बदलून 'panorama' केली आणि कॅमेरा फिरवायला सुरुवात केली. जसा कॅमेरा नदीच्या दक्षिण तटाकडे फिरवला तसे लक्ष वेधून घेतले ते काही अंतरावरील एका सुंदर अशा मंदिराने. चटकन गूगल काकांचा नकाशा उघडून पाहिले तर कळले की ते गांधरेश्वराचे मंदिर आहे. चालता चालता रस्त्यात एक कमान दिसली होती खरी, पण 'असेल असेच कुठले से

मंदिर' म्हणून मी दुर्लक्ष केलेले. पटकन वेळ पहिली. ट्रेनला नाही म्हटले तरी अजून अडीच तास होते, आणि स्टेशन वर बसण्यात मला फारसा रस नव्हता. म्हणून मग निघालो गांधरेश्वराचे दर्शन घ्यायला. पोहोचायला फार तर ५-७ मिनिटे लागली असतील. पण पोहोचल्या क्षणीच एक वेगळाच आनंद झाला. प्रशस्त पटांगण, त्यात छान तुळशी वृंदावन, एक रहाट असलेली विहीर, टुमदार, कोकणी शैलीतील 2 मंदिरं - एक अर्थातच गांधरेश्वराच अन दुसरं काली मातेचं, आणि पलीकडे नदीकाठावर एक घाट. सोबतीला प्रसन्न शांतता. बूट काढले, महादेवाच्या मंदिरात गेलो आणि दर्शन घेतलं. एक आत्मिक समाधान मिळालं. 'hidden gem' मिळाल्याचा आनंद होताच. मग पुढचा दीड तास बसलो तिकडेच. थोडा वेळ ध्यान केलं अन् बाकी वेळ घाटावर पोहणाऱ्या मुलांची गंमत बघत बसलो. ६.३० कधी वाजले ते कळलंच नाही. निघायची इच्छा होत नव्हती, पण गत्यंतर नव्हते. बऱ्याच प्रयत्नांती शेवटी निघालो. 5 मिनिटात पुन्हा त्या पुलावर आलो. आता सूर्य अस्ताला चालला होता. त्याचे दर्शन घेतले, आणखी २-४ फोटो काढले आणि संथपणे पावलं टाकत स्टेशन वर पोहोचलो. गांधरेश्वराच्या कृपेने फलाटावर फार वेळ काढावा लागला नाही. थोड्याच वेळात ट्रेन आली, अन् यात्रा सुफळ संपूर्ण झाल्याच्या भावनेने मी माझा परतीच प्रवास सुरू केला.